**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार, ३१-अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहुपूरी, सातारा अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार मिरज, ता.मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी, सावळी,
मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२ /सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.विकास खरात

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी, सावळी,
मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली तत्कालीन श्री.डी.के.मुजावर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सातबारा उताऱ्यावरील नोंदी दुरूस्त करून दुरूस्त उतारा मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी केली होती. माहितीच्या अधिकारात हा विषय येत नसून त्यासाठी महसूल नियमावलीनुसार स्वतंत्र अर्ज करावे लागण्याबाबत त्यांना माहिती देण्यात आली, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, सावळी, मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली श्री.डी.के.मुजावर यांनी केले. माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता श्री.वाडेकर यांनी सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार, ३१-अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहुपूरी, सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार मिरज, ता.मिरज, जि.सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी, सावळी,
मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२ /सातारा / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार मिरज, ता.मिरज, जि.सांगली श्री.विकास खरात

**जन माहिती अधिकारी** तथा गावकामगार तलाठी, सावळी,
मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली तत्कालीन श्री.डी.के.मुजावर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१६.१२.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २४.१.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २६.१.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ७.४.२००७ |

| | |
|---|---|
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

सातबारा उताऱ्यावरील नोंदी दुरूस्त करून दुरूस्त उतारा मिळण्याची मागणी अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी केली होती. माहितीच्या अधिकारात हा विषय येत नसून त्यासाठी महसूल नियमावलीनुसार स्वतंत्र अर्ज करावे लागण्याबाबत त्यांना माहिती देण्यात आली, असे निवेदन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा गावकामगार तलाठी, सावळी, मु.पो.सावळी, ता.मिरज, जि.सांगली श्री.डी.के.मुजावर यांनी केले. माहिती मिळाली असल्याचे अपीलकर्ता श्री.वाडेकर यांनी सांगितले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३१.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री.प्रितम रमेश बनसोड
फ्लॅट नं.६, प्रीती अपार्टमेंट, भन्साळी मळा,
विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयासमोर,
मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक ४२२ ००३ **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** समाजकल्याण अधिकारी (गट-१)
समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे-१ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता,
समाजकल्याण अधिकारी (गट-अ), यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रितम रमेश बनसोड
फ्लॅट नं.६, प्रीती अपार्टमेंट, भन्साळी मळा, विठ्ठल रुक्मिणी मंगल कार्यालयासमोर,
मखमलाबाद रोड, पंचवटी, नाशिक ४२२ ००३

**अपिलीय प्राधिकारी तथा** समाजकल्याण अधिकारी (गट-१)
समाजकल्याण अधिकारी यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.पी.एस.कवटे

**जन माहिती अधिकारी तथा** वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता,
समाजकल्याण अधिकारी (गट-अ), यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे-१ श्री.नंदकुमार फुले

| | | |
|---|---|---|
| | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६.०४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.०९.०६.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२८.०६.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -**<br><br>वर्ष २००३-०४ ते २००७-०८ या शैक्षणिक वर्षात किती एम.बी.ए. विद्यार्थ्यांनी अपंग शिष्यवृत्तीसाठी अर्ज केले व त्यांना किती शिष्यवृत्ती दिली? त्यांच्या महाविद्यालयांची नावे व शासन निर्णय २००३ टिप -३ यामध्ये शिक्षणशुल्क देण्याची तरतूद आहे व आपण ते देता, पण आपण ते विद्यापीठानुसार देता, याबाबतचे आदेश व अनुषंगिक मुद्दे | |

## विवेचन

आपण एम.बी.ए केले असून समाजकल्याण खात्याकडून विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या शिक्षण शुल्काबाबतची योग्य माहिती आपल्याला दिली जात नाही. शासन निर्णयानुसार अपंगांना शिक्षणशुल्क देण्याची तरतूद असताना ते विद्यापीठाच्या नियमानुसार कसे दिले जाते, हे स्पष्ट केलेले नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.प्रितम रमेश बनसोड यांनी केले.

श्री.बनसोड यांचा मुख्य विषय स्वतःच्या शिक्षण शुल्कासंबंधीचा आहे. मागितलेल्या माहितीबाबत त्यांना उत्तर देण्यात आले. तसेच शिक्षण शुल्क देण्याबाबत त्यांनी आधारभूत म्हणून दिलेल्या शासन निर्णयामध्ये अपंगांना शुल्क देण्याबाबत उल्लेख नाही. शिक्षण शुल्क समितीच्या पत्राप्रमाणे शुल्क मंजूर करण्यात आले असून या वर्षीच्या शैक्षणिक शुल्कात त्यांची रक्कम मंजूर केली आहे. त्याबाबतच्या संचिकेवर मुख्य लेखाधिकारी यांची मंजुरीची स्वाक्षरी आजच झाली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण अधिकारी (गट-अ) यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे श्री.नंदकुमार फुले यांनी केले.

जन माहिती अधिकारी यांनी मूळ अर्जाला दिलेल्या उत्तरातच शुल्काबाबत कळविणे आवश्यक होते. तथापि अपीलकर्त्याची मुख्य मागणी स्वतःला मिळणाऱ्या शुल्काच्या अनुषंगाने

असून त्याची पूर्तता केल्याचे तपशिलवार निवेदन जन माहिती अधिकाऱ्यांनी केले. श्री.बनसोड यांनी मूळ अर्जात काही बाबींचा खुलासा मागितला आहे, अशा स्वरुपाची मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये करता येत नाही.

## आदेश

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) समाजकल्याण खात्याकडून शासन निर्णयानुसार एम.बी.ए.च्या विद्यार्थ्यांना दिलेल्या अपंग शिष्यवृत्तीबाबतचा तपशील जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, समाजकल्याण अधिकारी (गट-अ) यांचे कार्यालय, जिल्हा परिषद, पुणे यांनी अपीलकर्ता श्री.प्रितम रमेश बनसोड यांना दहा दिवसांत निःशुल्क द्यावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुंवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. महेश विनायक भाटवडेकर
द्वारा श्री.अरविंद बा.भंडारे, ओटा क्र.७२७,
दत्तवाडी लडकतवाडी कॉर्नर, जि.पुणे ४११ ०३० **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे -३७ **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** चेअरमन / सेक्रेटरी,
मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
स.नं.८५/८६, पार्वती, सहकार नगर क्र.२, पुणे ४११ ००९

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२४१ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.०९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. महेश विनायक भाटवडेकर
द्वारा श्री.अरविंद बा.भंडारे, ओटा क्र.७२७,
दत्तवाडी लडकतवाडी कॉर्नर, जि.पुणे ४११ ०३०

**अपिलीय प्राधिकारी तथा** उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१), पुणे -३७ श्री.वि.वि.कोकरे
**जन माहिती अधिकारी तथा** चेअरमन / सेक्रेटरी,
मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित,
स.नं.८५/८६, पार्वती, सहकार नगर क्र.२, पुणे ४११ ००९ श्री.एस.पी.राऊत

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ०९.०४.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.०४.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१७.०५.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२०.०६.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** <br> मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे या संस्थेतील सभासद नोंदणी संबंधी आय नमुन्यातील नोंदवही, नामनिर्देशन व त्यातील सर्व फेरफारांच्या नोंदी, भागाची नोंदवही स्थापनेपासून आजतागायतच्या नोंदीसह इ. | |

## विवेचन

मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे ही पानशेत पूरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून दिर्घ मुदतीच्या भाडेपट्ट्याने व नाममात्र भुईभाड्याने मिळालेल्या जमिनीवरील संस्था आहे. बांधकामासाठी सरकारने मदत केलेली आहे, असे असतानाही सोसायटीच्या भागभांडवलधारकांच्याबाबतची व अन्य माहिती वारंवार मागूनही आपल्याला दिली जात नाही. जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर-१, पुणे यांच्याकडे आपण मूळ अर्ज केला होता. त्यांनी तो अर्ज संस्थेकडे वर्ग केला. संस्थेचे सचिव/अध्यक्ष यांनी माहिती दिली नाही, म्हणून आपण अपील केले. त्यावर अपिलीय प्राधिकारी म्हणून उपनिबंधकांनीच निर्णय देऊन केवळ एका भूखंडाबाबतची माहिती १५ दिवसात सशुल्क देण्याचा आदेश दिला. आपल्याला मूळ अर्जानुसार संपूर्ण माहिती मिळावी, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.महेश विनायक भाटवडेकर यांनी केले.

श्री.भाटवडेकर यांचा या गृहरचना संस्थेशी काहीही संबंध नाही. संस्थेचे एक सभासद श्री.वि.ज.भाटवडेकर यांच्या घटस्फोटित पत्नीचा तो मुलगा असून श्री.वि.ज.भाटवडेकर यांच्या भूखंड क्र.२२० वर हक्क नोंदविण्यासाठी, या भूखंडाला स्वतःचे नाव लागावे यासाठी सन २००० पासून विविध पातळ्यांवर अशा स्वरुपाचे अर्ज ते करीत आले आहेत. सर्व सभासदांच्या वारसांच्या नावनोंदीसह सर्व माहिती ते मागत आहेत. अन्य सभासदांबाबतची अशी माहिती व्यक्तिगत

असल्यामुळे देता येणार नाही. ती माहिती सार्वजनिक हिताशी संबंधित नाही. संस्थेला शासनाकडून मिळालेले कर्ज व्याजासकट फेडलेले आहे. या सर्व बाबी लक्षात घेऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री.भाटवडेकर यांना भूखंड क्र.२२० बाबतची माहिती देण्याचा आदेश दिला. त्यानुसार माहिती देण्याची व अन्य सभासदांची नावे कळविण्याची तयारी संस्थेने पूर्वीही दर्शविलेली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी श्री.एस.पी.राऊत यांनी केले.

श्री.भाटवडेकर यांना संबंधित असणाऱ्या भूखंडाची माहिती देण्याचा आदेश आपण दिला. अन्य माहितीबाबत त्रयस्थ पक्ष म्हणून सभासदांची हरकत असल्याने ती देऊ नये, हे संस्थेचे म्हणणे रास्त आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे श्री.वि.वि.कोकरे यांनी केले.

सर्व सभासदांच्या वारसांच्या नोंदी आदी तपशील न देण्याचा संस्थेचा निर्णय व अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(१), पुणे यांनी प्रथम अपिलात दिलेला निर्णय योग्य आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अमान्य करण्यात येत आहे.

(२) मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे या गृहरचना संस्थेच्या सभासदांची यादी व भूखंड क्र.२२० च्या संदर्भातील संस्थेच्या अभिलेखात नोंद असलेली माहिती योग्य ते शुल्क आकारुन अपीलकर्त्यास प्रमाणित करुन जन माहिती अधिकारी तथा सचिव, मिटिओरॉलॉजिकल सहकारी गृहरचना संस्था मर्यादित, पुणे यांनी द्यावी.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २६ .१०.२००९**

## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
## माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्रीमती जुलेखा अब्दुलरजाक पीरजादे
प्लॉट नं. २, लक्ष्मीनगर, लक्ष्मी रोड, १८ वी गल्ली,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** प्रशासन अधिकारी,
नगर परिषद शिक्षण मंडळ जयसिंगपूर,
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** मुख्याध्यापिका,
नगर परिषद उर्दु शाळा नं. ४, गल्ली नं. ७,
जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५ / कोल्हापूर |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.०८.२००७ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १४.०९.२००७ व दि. १७.०९.२००७ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** जयसिंगपूर नगर परिषदेच्या ऊर्दू शाळा नं. ४ चे मुख्याध्यापक पद, सदर पदाचा कार्यभार हस्तांतरण, शालेय साहित्य, सर्व शिक्षा अभियान अनुदान, शालेय पोषण आहार योजना, पटसंख्या व उपस्थिती, बोगस विद्यार्थी संख्या, शाळेतील आवक जावक कागदपत्रे तदनुषंगिक एकूण १६ मुद्दे. | |

### विवेचन

अपीलकर्त्या श्रीमती जुलेखा अब्दुलरजाक परिजादे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र-ब व अपिलीय प्राधिकारी यांनी दिलेला निर्णय इ. आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसून

त्यांनी अपिलीय प्राधिकाऱ्याकडे प्रथम अपील केले अथवा कसे याबाबत बोध होत नसल्याने त्यांनी प्रथम अपिलाबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबत आयोगास अवगत करावे, असे त्यांना दिनांक ०९.१०.२००७ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यास त्यांनी कोणताही प्रतिसाद दिलेला नाही. हे लक्षात घेता श्रीमती पीरजादे यांच्या अपिलावर आयोगाच्या स्तरावरुन कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७- १० -२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. सदानंद महादेव गांधले
मु.पो.ता.इंदापूर, जि.पुणे **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५४/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.१०.२००९ |

**३. उपस्थित**
**अपीलकर्ता** श्री. सदानंद महादेव गांधले
मु.पो.ता.इंदापूर, जि.पुणे
**अपिलीय प्राधिकारी तथा** निवासी नायब तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.श्रीपती खंडू मोरे
**जन माहिती अधिकारी तथा** तहसीलदार,
इंदापूर तहसील कार्यालय, ता.इंदापूर, जि.पुणे श्री.हनुमंत शिवाजी पाटील

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०४.०२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१३.०३.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. |
| ७ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती -** <br> १) वाटणीपत्र प्रकरणातील सहहिस्सेदार श्री.चंद्रकांत महादेव गांधले व सौ.अनुसया सुखदेव पागळे यांचे जबाब २)मं.अ.भिगवण यांचा विहिर नोंदीबाबत अहवाल / शेरा इ. एकूण ७ मुद्दे | |

## विवेचन

वाटणीपत्र प्रकरणातील जबाब व विहिर नोंदीबाबतचा अर्ज याची माहिती अर्ज केल्यापासून ५८० दिवस झाले तरी मिळालेली नाही. यातील जबाबांच्या प्रती नष्ट केल्याचे अधिकाऱ्यांनी आपल्याला कळविले आहे, परंतु एप्रिल २००७ पासून या कागदपत्रांची मागणी आपण विविध अर्जांद्वारे व माहितीच्या अधिकारात करीत असताना ती नष्ट कशी केली याचे उत्तर मिळाले पाहिजे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.सदानंद महादेव गांधले यांनी केले.

श्री.गांधले यांना माहितीबाबत विहित मुदतीत कळविण्यात आले. कार्यालयाकडील उपलब्ध माहिती कागदपत्रातून शोध घेऊन द्यावी लागल्यामुळे विलंब झाला. त्यांनाही त्याबाबतच्या सर्व संचिका दाखवून विलंबाची कल्पना देण्यात आली. वाटणीपत्र प्रकरणातील जबाबाची कागदपत्रे ड वर्गातील असून जतनाचा कालावधी एक वर्षाचा असल्यामुळे ती नष्ट केली असल्याचे त्यांना कळविण्यात आले, तसेच स्पष्ट करून सांगण्यातही आले. हे प्रकरण सन २००५ - मधील आहे व श्री.गांधले यांनी दि.४.२.२००८ रोजी माहितीच्या अधिकारात अर्ज केला आहे. त्याआधी ते म्हणत असलेली दि.५.४.२००७ ही तारीखही लक्षात घेतली तरी कागदपत्रांची वर्षाची मुदत उलटून गेलेली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, इंदापूर श्री.हनुमंत शिवाजी पाटील व अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, इंदापूर श्री.श्रीपती खंडू मोरे यांनी केले. वाटप प्रकरण दि.२२.३.२००५ रोजी निकाली काढण्यात आले असल्यामुळे

त्यातील फक्त आदेश ठेऊन बाकीचे कागदपत्र नाश केले जातात. त्यानुसार केलेली कार्यवाही योग्य आहे, असे निवेदन अपिलीय प्राधिकारी श्री.श्रीपती खंडू मोरे यांनी केले.

अपीलकर्त्यास उपलब्ध माहिती देण्यात आली आहे. कागदपत्रांचा शोध घेतल्याचे संबंधितांना दिलेल्या पत्रांच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी श्री.हनुमंत शिवाजी पाटील यांनी नमूद केले असले तरी, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये विहित मुदतीत माहिती देण्याबाबत त्यांना समज देण्यात येत आहे. ड वर्गातील अभिलेखांबाबतचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे निवेदन स्वयंस्पष्ट व योग्य आहे.

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२९.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.रविंद्र संपत दळवी
मु.पो.लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, वडगाव मावळ,
ता.मावळ, जि.पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय मावळ, ता.मावळ, जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २२५६ / पुणे / २००८ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.४.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.रविंद्र संपत दळवी
मु.पो.लोणीकंद, ता.हवेली, जि.पुणे

**अपिलीय प्राधिकारी** तथा तहसीलदार, मावळ,
ता.मावळ, जि.पुणे श्री.सचिन बारवकर

**जन माहिती अधिकारी** तथा निवासी नायब तहसीलदार,
तहसील कार्यालय मावळ, ता.मावळ, जि.पुणे श्री.चंद्रकांत जाधव

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २०.११.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १.४.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ९.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.७.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>वाहन क्र.एमएच-१२-पी१०४ चे दि.१.८.२००६ चे दुरुस्तीचे बिल. माहे १५ नोव्हेंबर २००६ ते डिसेंबर २००६ चे वेतन, शासकीय गणवेश ही बिले आजपर्यंत का दिली नाहीत याबाबतचा पूर्ण अहवाल. रजेचे अर्ज दि.१४.८.२००६, दि.२९.८.२००६, हजेरीपटातील माहे सप्टेंबर २००६ चे पान, क्र.आस्था/कावि/७२२/२००६, दि.३०.१२.२००६ नुसार तक्रारी अर्ज, दि.२२.११.२००६ चे नोटिसीचा खुलासा. | |

## विवेचन

हजेरीपट, रजेचे अर्ज आदींबाबतची आपल्याला हवी असलेली कागदपत्रे आढळून येत नसल्याचे उत्तर आपल्याला दिले जाते, त्यामुळे कागदपत्रे मिळत नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.रविंद्र संपत दळवी यांनी केले. संबंधित कागदपत्रे आढळून येत नसल्याचे तत्कालीन जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले आहे. शासकीय वाहनाविषयीची कागदपत्रे आदी माहिती दिली आहे. कागदपत्रे ब वर्गातील अभिलेख असून तत्कालीन लिपीक श्रीमती राजश्री सुनील आढळ यांच्याविरुध्द जिल्हाधिकारी, पुणे यांच्याकडे अहवाल सादर करुन कारवाई करण्यात आली होती, असे जन माहिती अधिकारी तथा निवासी नायब तहसीलदार, मावळ तहसील कार्यालय श्री.चंद्रकांत जाधव यांनी नमूद केले.

जतनाच्या कालावधीनुसार संबंधित कागदपत्रे उपलब्ध होत नसल्यास संबंधितांविरुध्द फौजदारी गुन्हा महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख कायदा, २००५ अन्वये दाखल करण्याची तरतूद आहे. याबाबत संबंधितांचा खुलासा घेऊन एक आठवड्यात जन माहिती अधिकाऱ्यांनी आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार तत्कालीन लिपीक श्रीमती आढळ यांना अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मावळ यांनी सूचना

दिली. त्यानुसार त्यांनी दि.२७.५.२००९ रोजी आयोगाला खुलासा सादर केला. आपण आपली बदली झाल्यानंतर लिपीक श्री.ए.सी.शेडगे यांना आस्थापना संकलनाची चार्जयादी सुपूर्त केली, त्यात श्री.दळवी यांची पृष्ठांकन केलेली परिपूर्ण संचिकाही होती. यातील, तसेच हजेरीपटातील श्री.दळवी यांनी मागणी केलेली कागदपत्रेच गहाळ झाल्याचे दिसते. पाने स्वत: गहाळ करुन श्री.दळवी यांनी माहिती अधिकारात अर्ज दिल्याची शक्यता नाकारता येत नाही. आपल्याला व्यक्तिशः मानसिक त्रास देण्याकरिताही त्यांनी हे कृत्य केले आहे, असे श्रीमती आढळ यांनी खुलाशात नमूद केले आहे. तसेच याच विषयात जिल्हाधिकारी, पुणे यांनी महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम, १९७६ सुधारणा नियम २००६ मधील नियम ५ व ६ नुसार पुढील एक वेतनवाढ एक वर्षाकरिता भावी वेतनवाढीवर परिणाम न करता रोखून ठेवण्याची शास्ती केली असून, त्याची अंमलबजावणी झालेली आहे. एकाच विषयात आपल्यावर दोनदा कारवाई होऊ नये, अशी विनंती त्यांनी केली आहे. तसेच अभिप्राय अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार, मावळ यांनी दि.३१.८.२००९ च्या निवेदनाद्वारे आयोगाला धारणा कायम होण्यासाठी सादर केले आहेत, ते मान्य करण्यात येत आहेत.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१४.१०.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.निवृत्ती तुकाराम रोकडे
२०९/२६२ अ, गोडोली, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम पाटबंधारे विभाग, सातारा, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३० / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ५.२.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक,
लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, सिंचन भवन, पुणे श्री.बी.सी.कुंजीर

**जन माहिती अधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
धोम पाटबंधारे विभाग, सातारा, जि.सातारा श्री.बी.एस.बिराजदार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५.७.२००७ व २५.८.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३.१०.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. — |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची प्रत (जोडपत्र-अ) सोबत जोडली आहे. |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपीलकर्त्यांने सुनावणीची मागणी केल्यामुळे व अपिलीय प्राधिकारी गैरहजर असल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.५.२.२००९ रोजी घेण्यात आली.

अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांच्यासमवेत दि.५.१२.२००५ रोजी झालेल्या आढावा बैठकीतील निर्णयांचा अनुपालन अहवाल पाठविण्यात टाळाटाळ केलेल्या अधिकाऱ्यांविरुध्द कायदेशीर कारवाई करण्याबाबत कुचराई करण्यात येत असल्याच्या कारणावरुन व माहिती दिली नसल्यामुळे अपीलकर्ता श्री.निवृत्ती तुकाराम रोकडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कालवे निरीक्षक श्री.जी.बी.कांबळे यांनी स्वत:च्या बदल्या, प्रलंबित देयके आदीबाबत दि.५.१२.२००५ च्या आढावा बैठकीत तक्रार केली होती. त्या संदर्भात श्री.रोकडे यांनी माहितीच्या अधिकारात तीन अर्ज केले. त्यानुसार त्यांना माहिती देण्यात आली. परंतु विस्तृत स्वरुपात माहिती नसल्याच्या कारणावरुन त्यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, पुणे यांच्याकडे अपील केले. तसेच प्रथम अपिलात व राज्य माहिती आयोगाकडील अपिलात मूळ अर्जापेक्षा वेगळे काही मुद्दे त्यांनी उपस्थित केले आहेत. दि.५.१२.२००५ च्या आढावा बैठकीच्या पत्राच्या उत्तराची प्रमाणित नक्कल मूळ अर्जात त्यांनी मागितली आहे. अधिकाऱ्यांवर कारवाई वगैरे मुद्दे त्यात नाहीत. तसेच वेळोवेळी त्यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांच्या अनुषंगाने माहिती देण्यात आली. दि.२२.८.२००८ रोजी सातारा येथे झालेल्या

विशेष अपील निर्गत कार्यक्रमांत दोन मुद्दयांची अतिरिक्त व विस्तृत स्वरुपातील माहिती त्यांनी मागितली व ती त्यांना दोन दिवसात देण्याचे मान्य केले. त्यानुसार दि.२५.८.२००८ रोजी ती त्यांना देण्यात आली, असे श्री.रोकडे यांची पोच असलेल्या पत्राच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी श्री.बी.एस.बिराजदार व अपिलीय प्राधिकारी श्री.बी.सी.कुंजीर यांनी नमूद केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.२९.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. महमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २३८ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि. 22/8/2008 |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. महमद बाबालाल मुल्ला
३८, लक्ष्मीनगर, एम.आय.डी.सी.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, सातारा तर्फे प्रतिनिधी श्री. एस.व्ही. गायकवाड

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, सातारा श्री. के.बी. जेबले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २१.५.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २५.६.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२२.८.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश करण्यात आलेला होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २२.८.२००८ रोजी अपिलाची सुनावणी घेण्यात आली.

जनता सहकारी बँकेने आपला ट्रक जास्त किंमतीचा प्रस्ताव आलेला असताना कमी किंमतीत व बेकायदेशीरपणे लिलाव केला. कर्जाची परतफेड केलेली असतानाही असा लिलाव केल्यामुळे त्याबाबतची माहिती आपण जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा यांच्याकडे मागितली होती. त्यांनी ती दिली नाही. अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा यांनी अपील फेटाळले. म्हणून दोघांवरही कारवाई करावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री. महमद बाबालाल मुल्ला यांनी केली. थकीत कर्जापोटी बँकेने लिलाव केला. संबंधित माहिती बँकेच्या कक्षेतील आहे व या बँकेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही. तरीही माहिती देण्याबाबत नियंत्रक अधिकारी म्हणून आपण बँकेला कळविले व त्यानुसार बँकेने माहिती दिली, असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सातारा श्री. के.पी. जेबले व अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, सातारा डॉ. के.एन.जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले. जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी केलेली कार्यवाही योग्य असून बँकेने माहिती दिली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. २१.१०.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.तानाजी होनाजी दाते
काकडे पार्क बि. व रुम नं.एम/२/९,
तानाजीनगर, चिंचवडगाव, पुणे-३३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २४१२+२४१३+२४१४+२३३२ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.तानाजी होनाजी दाते
काकडे पार्क बि. व रुम नं.एम/२/९, तानाजीनगर, चिंचवडगाव, पुणे-३३

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.सुधाकर विष्णू देशमुख
**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे-१८ श्री.बाळू गेनू पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.४.२००८ (अ.क्र.२४१२)<br>दि. १७.६.२००८ (अ.क्र.२४१३/२४१४)<br>दि. १५.३.२००८ (अ.क्र.२३३२) |

| | | |
|---|---|---|
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.४.२००८ (अ.क्र.२४१२)<br>दि. ११.७.२००८(अ.क्र.२४१३/२४१४)<br>दि.७.४.२००८ (अ.क्र.२३३२) |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २०.५.२००८ (अ.क्र.२४१२)<br>दि. १८.७.२००८ (अ.क्र.२४१३/२४१४)<br>दि. १७.५.२००८ (अ.क्र.२३३२) |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.६.२००८ (अ.क्र.२४१२)<br>दि. ३०.८.२००८ (अ.क्र.२४१३)<br>दि. २८.८.२००८ (अ.क्र.२४१४)<br>दि. ११.६.२००८ (अ.क्र.२३३२) |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>सोबत प्रत जोडली आहे. | |

## विवेचन

सन १९८८ पासून मागासवर्गीय व अनुसूचित जातीजमातीतील कर्मचाऱ्यांची भरती व पदोन्नती, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेपासून त्याबाबत वेळोवेळी विविध समित्यांमध्ये झालेले ठराव, आदेश इत्यादी माहिती अपीलकर्ता श्री.तानाजी होनाजी दाते यांनी जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. ती अपूर्ण व दिशाभूल करणारी मिळाल्याच्या कारणावरुन श्री.दाते यांनी राज्य माहिती आयोगाकडे चार अपिले केली आहेत.

१३ अधिकारी / कर्मचारी यांच्या संदर्भातील माहिती त्रयस्थ पक्षाविषयीची असून त्यांनी हरकत घेतल्यामुळे देता येत नसल्याचे जन माहिती अधिकाऱ्यांनी कळविले. आपल्या अर्जांवर केलेल्या कार्यवाहीची माहिती देण्याऐवजी अर्जांच्याच छायांकित प्रती दिल्या. शासनाच्या दप्तर दिरंगाई कायद्याची नियमावली दिली नाही. शैक्षणिक अर्हता नसताना काही व्यक्तींना नेमणुका दिल्या जातात मागासवर्गीय व अनुसूचित जातीजमातींसाठी असलेल्या तरतुदींनुसारची भरती / पदोन्नती याबाबत पारदर्शकतेने माहिती दिली जात नाही, असे प्रतिपादन श्री.दाते यांनी केले.

श्री.दाते यांनी सन १९८८ पासूनची, तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापनेपासूनची विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली आहे. प्रत्येक वेळी विहित मुदतीत त्यांना उत्तर देण्यात आले आहे. २५ वर्षांहून अधिक काळातील माहिती संकलित करुन देण्याची मागणी ते करतात. संबंधित संचिकांचे अवलोकन त्यांनी करावे, तसेच महानगरपालिकेत झालेले ठराव, महानगरपालिका आयुक्तांनी दिलेले आदेश, अशा ढोबळ स्वरुपात माहिती मागण्याऐवजी ठराव क्रमांक, आदेश क्रमांक असा तपशील त्यांनी दिल्यास नेमकेपणाने माहिती देता येईल हेही त्यांना वेळोवेळी स्पष्ट करण्यात आले, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री.बाळू गेनू पवार यांनी पूरक कागदपत्रांसह केले.

भरती व पदोन्नतीच्या अनुषंगानेच श्री.दाते यांनी दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला आहे. तसेच फौजदारी स्वरुपाच्या गुन्ह्याची नोंद त्यांच्या विरुध्द आहे. त्यामुळे आपली व्यक्तिगत माहिती त्यांना देण्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांनी त्रयस्थ पक्ष म्हणून हरकत घेतली. तरीही सार्वजनिक स्वरुपात उपलब्ध असणे आवश्यक असलेली माहिती देण्याची तयारी जन माहिती अधिकाऱ्यांनी दर्शविली. दप्तर दिरंगाईचा कायदा हे सर्व नागरिकांना उपलब्ध असलेले अभिलेख आहेत. तेही जन माहिती अधिकाऱ्यांनी द्यावेत अशी त्यांची अपेक्षा आहे. महानगरपालिकेकडील अभिलेखांचे अवलोकन करुन आवश्यक ती माहिती ते प्राप्त करुन घेऊ शकतात, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री.सुधाकर विष्णू देशमुख यांनी केले.

श्री.दाते यांनी अत्यंत विस्तृत स्वरुपाची व अनेकदा ढोबळ मानाने उल्लेख करुन माहिती मागितली आहे. संचिकांचे अवलोकन करुन नेमकेपणाने तपशील देऊन आपल्याला हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती ते प्राप्त करुन घेऊ शकतात. आरोग्य निरीक्षक म्हणून आपण काम करीत असल्यामुळे अशा अवलोकनासाठी आपल्याला वेळ होत नाही, हे त्यांचे समर्थन मान्य करता येणार नाही. भाष्य न करता व माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये माहितीच्या व्याख्येत बसणारे नेमके मुद्दे नमूद करुन अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकाऱ्यांना सर्व

अपिलांबाबतचा एकत्रित अर्ज द्यावा. त्यानुसार श्री.दाते यांना माहिती देऊन व आवश्यक तेथे अभिलेखांचे अवलोकन करु देऊन त्यांना हव्या असलेल्या कागदपत्रांच्या प्रती जन माहिती अधिकाऱ्यांनी १५ दिवसांत द्याव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. काही माहिती पूर्वीच त्यांना निःशुल्क देण्यात आली आहे. मात्र आयोगाच्या आदेशानुसार नेमकेपणाने मुद्दे व तपशील नमूद करणारा अर्ज श्री.दाते यांनी दिलेला नाही व त्याबाबत संपर्कही साधलेला नाही, असे अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, प्रशासन, पिंपरी चिंचवड महानगरपालिका श्री.सुधाकर देशमुख यांनी दि.७.१०.२००९ च्या अहवालान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१ .१०.२००९